**प्रेसनोट** **दिनांक ३०/०३/२०१९**

## समर्थ पोलीस ठाणे पुणे

## पोलीसांचे सर्तकतेने वाहन चोरास अटक

दिनांक २९/३/२०१९ रोजी समर्थ पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रात श्री. बाळकृष्ण कदम , वरिष्ठ पोलीस निरीक्षक , समर्थ पोलीस ठाणे पुणे यांचे मार्गदर्शनानुसार पोहवा. एस.जी. काळे , पोशि. बाळासाहेब भांगले , पोशि. अनिल शिंदे , पोशि. सचिन पवार नेमणूक - समर्थ पोलीस ठाणे पणे शहर हे सायंकाळी गस्त फिरत होते . गस्त फिरत असताना ते दारुवाला पूलाजवळ आले असताना त्यांना एक हिंरो होंडा पॅशन मोटार सायकलस्वार हा त्यांना वेडीवाकडी चालवित असलेला दिसला. यामुळे त्याचेकडे असलेली गाडी चोरीची असल्याचा संशय बळावल्याने पोलीसांनी त्यांचा पाठलाग करुन त्यास अटकाव करुन त्यास थांबणेस भाग पाडले. मोटार सायकलस्वारास पोलीसांनी नांव पत्ता विचारणा केली असता त्याने त्याचे नांव विष्णू कांबळे वय ३० रा. रामटेकडी, हडपसर पुणे असे असल्याचे त्याने सांगितले . त्याला त्याचे ताब्यात असलेले मोटार सायकल बाबत विचारणा करता त्याने प्रथम गाडी त्याचे मित्राची असल्याची बतावणी केली .मात्र पोलीसांनी आपला संशय पक्का असल्याने त्याचेकडे अधिक विचारपूस करीत त्याला जवळच असलेले सोमवार पेठ पोलीस चौकीत नेवुन विचारणा करताच त्याने प्रथम सांगिलेली माहिती खोटी असून त्याचे कडील हिरो होंडा पॅशन मोटार सायकल ही त्याने हडसर परिसरातून चोरी केलेली असल्याचे सांगितले. यामुळे पोलीस हवालदार काळे यांनी त्याला दि.२९/३/२०१९ रोजी १८-०० वा. सीआरपीसी कलम ४१(१)(ड) अन्वये अटक करुन त्याचेकडील मोटार सायकल ही पंचनाम्याने जप्त करुन ताब्यात घेतली .

जप्त करण्यात आलेले मोटार सायकल बाबत हडपसर पोस्टे येथून माहिती घेतली असता सदरची मोटार सायकल ही चोरीस गेलेली असून त्याचा हडपसर पोलीस ठाणे पुणे येथे गुन्हा रजि. नं. १२००/२०१८ भादवि. ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली . यामुळे केलेल्या कारवाईची माहिती हडपसर पोलीस ठाण्यात कळविण्यात आली . त्याप्रमाणे हडपसर पोस्टे कडील पो.हवा .होळकर यांनी समर्थ पोलीस ठाण्यात येऊन आरोपी व चोरीस गेलेले वाहनाचा ताबा घेतला व गुन्हा उघडकीस आलेला आहे.